# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक 23.07.2015 (का.प.क्रं.-03) (दिनांक 15.07.2015 ची तहकूब सभा) रोजी संपन्न झालेल्या स्थायी सभेचे इतिवृत्त

गुरूवार दिनांक 23 जुलै 2015 रोजी (का.प.क्र.03) (दिनांक 15/07/2015 रोजीची तहकूब सभा) मा.सभापती श्री.दिलीप थोरात यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वा. वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला प्र.आयुक्त तथा अति.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव, श्री.एम.ए.पठाण संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
02. स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
03. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
04. स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
05. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
06. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
07. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
08. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
09. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
10. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
11. स.स.श्री.खान इरशाद इब्राहीम
12. स.स.श्री.नाईकवाडी अब्दुल रहिम शेख
13. स.स.श्रीमती शेख समीना इलियास
14. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे
15. स.स.श्रीमती रेश्मा अशफाक कुरैशी

श्री.गजानन बारवाल : मनपा मुख्यालयामध्ये आज सकाळी 10.00 वाजता मा.महापौर,मा.सभापती, स्थायी समिती आणि मी स्वतः अनेक विभागास भेट दिली असता अनेक अधिकारी कर्मचारी वेळेवर कार्यालयात उपस्थित नव्हते. यापुर्वी अनेकवेळा मा.महापौरांनी व उपआयुक्त (म) यांनी पाहणी केली आहे. विभाग प्रमुख, शाखा प्रमुख बद्दल विचारले वर माहिती मिळत नाही. कर्मचाऱ्यांना दंडही ठोठवण्यात आलेला आहे. तरीही याचा प्रभाव दिसुन येत नाही.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

उपआयुक्त (म) : मा.महापौर यांनी सहा वेळेस अचानक पाहणी केलेली आहे. 1-2 भेटीच्या वेळी मी स्वतः त्यांचे सोबत होतो. पहिल्या भेटीस 80 गैरहजर दुसऱ्या भेटीस 95 गैरहजर पहिल्या दोन वेळो समज देवुन माफ केले. तीसऱ्या वेळी 80 कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस दिले. खुलासा असमाधानकरक असल्यास व तीन वेळेस उशीरा आढळुन आलेल्या कर्मचाऱ्यांना नियमानुसार दंड आकारण्यात आलेला आहे. उशीरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांविरूध्द नियमानुसार कार्यवाही झालेली आहे.

श्री.गजानन बारवाल परंतु कर्मचाऱ्यांमध्ये याचा काहीही परिणाम झालेला नाही. बदल झालेला नाही. विभाग प्रमुखांनी ॲक्शन घेण्याची गरज आहे. नगर सचिव विभागातील सर्व कर्मचारी आजच्या पाहणीमध्ये वेळेवर हजर होते. त्याच प्रमाणे इतर विभागातही कर्मचारी हजर पाहिजे.

मा.सभापती :आजच्या पाहणीमध्ये बरेच कर्मचारी गैरहजर आढळलेले आहे. ही गंभीर बाब आहे. विभाग प्रमुखांनी जे कर्मचारी नियमीत गैरहजर असतात त्यांच्याविरूध्द पुन्हा नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.नाईकवाडी र.अब्दुल :बायोमॅट्रिक सिस्टीम चालू आहे का खुलासा करण्यात यावा.

आस्थापना अधिकारी-1 :कर्मचारी वेळेवर सकाळी 10.00 वाजता कार्यालयात येणे हे त्यांचे कर्तव्य आहे त्यावर नियंत्रणासाठी बायोमॅट्रिक सिस्टीम कार्यालयांमध्ये लावण्यात आलेली आहे. बायोमॅट्रिकचे नियंत्रण सिस्टीम मॅनेजर यांचेकडुन करण्यात येते.

श्री.नाईकवाडी अब्दुल र :लंन्चमध्ये कर्मचारी कार्यालयाबाहेर जात असेल तर त्यांचेवर नियंत्रण कसे ठेवणार.

आस्थापना अधिकारी-1 :हालचाल रजिष्टर ठेवण्यात आलेले आहे. त्यामध्ये कार्यालयीन वेळेत कार्यालय सोडतांना हलचल रजिष्टरमध्ये नोंद करणे आवश्यक आहे. विभाग प्रमुख्यांनी या सर्वबाबींवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

श्री.नाईकवाडी अब्दुल र :शिक्षा देण्यात यावी.

मा.सभापती :मा.अतिरिक्त आयुक्त या संदर्भात खुलासा करतील.

मा.अतिरिक्त आयुक्त :बायोमॅट्रिक सिस्टीम बसविण्यात आलेली आहे परंतु पाहिजे तसे सिस्टीम कार्यान्वित झालेली नाही. बायोमॅट्रिक कार्यान्वित करण्यात येईल तीन वेळेस लेट मार्क झाल्यास एक सी.एल. कापण्यात येईल. अशा प्रकारची शासकीय यंत्रणा आखुन दिलेली आहे. त्या पध्दतीने ती कंम्पलसरी करण्यात येईल.

श्री.गजानन मनगटे :वैयक्तिक शौचालय सर्वेक्षणाचे आदेश प्रशासनाकडुन काढण्यात आलेले आहे. महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांचे आदेश काढण्यात आलेले आहे. यासाठी वेगळी यंत्रणा का लावण्यात आली नाही. अत्यावश्यक अधिकारी कर्मचारी सर्वेक्षणाला गेल्यामुळे कामे खोळंबली आहेत.

श्री.नितीन चित्ते :केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत योजने अन्वये महानगरपालिकेतील अधिकारी/ अभियंते तसेच लेखा विभागातील कर्मचारी यांना सर्वेक्षणाच्या कामासाठी गेले असल्यामुळे कामे बंद झालेले आहे.

श्री.मोहन मेघावाले :सिडको, हडको, समर्थनगर, येथील बजेटचे कुठलेही काम झालेले नाही. सिडको हडकोमध्ये लीगल वसाहत आहे. माझ्या बाजुच्या वार्डात जलवाहीनीचे उद्‌घाटन तेथे समांतर व मनपाचे शौचालय प्रत्येक घरात आहे त्या ठिकाणी सर्वेची आवश्यकता काय? अधिकारी कर्मचारी हे सर्वेमुळे विनाकारण टाईमपास करत आहे. ज्या ठिकाणी स्लम भाग आहे, गुंठेवारी भाग आहे त्या ठिकाणी शौचालयाचा सर्वे आवश्यक आहे. ईतर ठिकाणी सर्वे करण्याची आवश्यकता नाही.वैयक्तिक शौचालयाच्या सर्वेसाठी आधारकार्ड कशासाठी पाहिजे.

मा.सभापती :सर्वे संबधी माहिती देण्यात यावी.

मा.अतिरिक्त आयुक्त :शाळाबाहय सर्वे ज्या दिवशी घेणार होते त्या दिवशी वैयक्तिक शौचालयाचा सर्वे करण्यासंदर्भात आदल्या दिवशी मा.सचिव यांचे आदेशान्वये सर्वे करण्याचे आदेश प्राप्त झाले. शहरामध्ये उघडयावर शौचास बसण्याचे प्रमाण कमी आहे. महानगरपालिकेने सुजल निर्मल योजने अंतर्गत शौचालयाचा सर्वे केलेला आहे. 18000 संख्या प्राप्त झालेले आहे 35 कोटी रूपये योजना मंजूर झाली. परंतु विहीत फॉरमॅटमध्ये शासनाकडे माहिती सादर करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. सदर फॉरमॅटमध्ये शहरातील एकुण प्रॉपर्टी बाबत माहिती

होण्यासाठी वाव होता. सदर आदेश हे त्वरीत काढण्यासाठी निवडणूकीच्या ब्लॉकवाईझ आदेश होते त्यानुसार आदेश काढण्यात आले. सदर योजनेतुन फंडींग मिळणार आहे. सदर आदेश काही काळापुरतेच मर्यादित होते. ते आदेश रद्द करण्यात आलेले आहे. उर्वरित कामासाठी वार्ड कर्मचारी आणि पुरूष शिक्षकांची नेमणुक करण्यात आलेली आहे. त्यांच्याकडून हे काम करून घेण्यात येणार आहे.

श्री.गजानन बारवाल :गेल्या कित्येक दिवसांपासून राकाजचे प्रकरणाची चर्चा चालु आहे. शहरात कोणत्या कोणत्या ठिकाणी बीओटी प्रकल्प चालू आहे याची माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :बीओटी कक्ष प्रमुख सुट्टीवर असल्याने सदरचा विषय नंतर घेण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल :बीओटीचे प्रकल्प अर्धवट अवस्थेत आहे. सदरची माहिती देण्यात यावी.

श्री.नितीन चित्ते :राकाज सारखी परवानगी इतर प्रकरणांना देण्यात येऊ नये. बीओटी कक्षाची जबाबदारी संबधीत अधिकारी यांचेकडुन काढुन घेण्यात यावे. सर्वे नंबर 201 मौजे हर्सुल येथील जेलला लागुन असलेल्या जागेत परवानगी देण्यात आली त्यानंतर पुन्हा तोडण्याचा प्रयत्न आदेशित करण्यात आले. दिनांक 22 जून रोजी पहिल्या स्थायी समिती सभेमध्ये गट नंबर 155 मिटमिटा संदर्भात काही प्रश्न विचारणा केली होती त्याचे उत्तर मिळालेले नाही. ले आऊटला स्थगीती दिली म्हणुन सांगण्यात आले. प्रश्न विचारण्यात आला होता स्थगीती दिली कशी.गट नंबर 155 व गट नंबर 201 हर्सुल बाबत सविस्तर खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :सहाय्यक संचालक सुट्टीवर आहेत. तब्येत बरोबर नाही.

श्री.नाईकवाडी अब्दुल :कारागृहापासून 500 मीटरपर्यंत बांधकाम करण्यात येत असल्याने कैद्यांच्या सुरक्षेला धोका निर्माण होत असल्याचे कारागृह प्रशासनाने म्हटले आहे. मनपाने परवानगी दिल्या नंतर तेथील नागरीकांनी त्या ठिकाणी बांधकाम केलेले आहे.

श्री.नितीन चित्ते :महानगरपालिकेला एकुण 9 पत्र दिलेले आहे. सदर बांधकाम हे कारागृहाच्या कैद्यांच्या जीवीतेला सुरक्षेला धोका निर्माण होत आहे. सर्वे क्रमांक 201 मधील बांधकाम त्वरीत थांबविण्यात यावे व शासन निर्णयानुसार 500 मीटरपर्यंतच्या बांधकाम परवानगी रद्द करण्यात यावी. सदरचे बांधकाम रोजच्या रोज चालू असुन बांधकाम तात्काळ थांबविण्यात यावे म्हणुन पत्रात नमुद केले आहे. भुखंड क्रमांक 27 यांना दिनांक 7.6.2013 रोजी परवानगी दिली. भुखंड क्रमांक 19 न्यांसाठी 692 क्रमांकाची बांधकाम परवानगी दि.11.12.2013, 763 क्रमांकाची बांधकाम परवानगी दि.2.12.2013. भुखंड क्रमांक 19 कुणाचा आहे माहिती देण्यात यावी. तीन भुखंड आरक्षीत केले. 30 लाखाचे एक भुखंड आहेत. महानगरपालिका प्रशासनाला पत्र देण्यात आले होते. परंतु याची प्रशासनाने कुठलीही दखल घेतली नाही. दिनांक 17 डिसेंबर 2014 व 26 फेब्रुवारी 2014 रोजी कारागृहाने पत्र पाठविले होते. (सदरचे पत्र सभागृहात वाचून दाखवितात.) कारागृहाच्या सुरक्षेला धोका निर्माण होत असल्याने बांधकाम थांबविण्यात येतात. दिलेली परवानगी आदेशाच्या अनुषंगाने जागेवर कोणतेही बांधकाम करण्यात येऊ नये. असे सहाय्यक संचालक नगर रचना औरंगाबाद यांनी आदेश दिले आहे. संबधीत अतिक्रमण प्रमुख त्या ठिकाणी अतिक्रमण पाडण्यास गेले. अतिक्रमण विभागाला अतिक्रमण पाडण्यासंदर्भांत पत्र देण्यात आले होते का? खुलासा करण्यात यावे.

श्री.मोहन मेघावाले :राकाज सारखे प्रकरणे तसेच शहरातील अतिक्रमणाबाबत स.सदस्यांनीच लक्ष देवुन माहिती द्यावी का? हर्सुल येथील प्रकरणात महानगरपालिकेने परवानगी

दिल्यानंतरच बांधकाम केले. परंतु पुन्हा बांधकाम पाडण्यासंदर्भात आदेश देण्यात येतात. याचा विचार प्रशासनाने करायला हवा.

श्री.गजानन बारवाल :गट नंबर 210 बाबत हर्सुल कारागृहाने वेळोवेळी मनपा प्रशासनाला कळविले. नियमानुसार कारागृहापासून तेवढे अंतर का सोडण्यात आले नाही. प्रशासनाला नियम माहिती नव्हते का? हेरिटेज इमारतींबाबत झालेले अतिक्रमणांची दखल घेणे आवश्यक आहे.

श्री.रावसाहेब आमले :दिनांक 10.07.2015 रोजी सभेमध्ये गट नंबर 155 बाबत माहिती विचारणा केली होती ती माहिती अद्यापपर्यंत मिळालेली नाही.

श्री.नितीन चित्ते :गट क्रमांक 155 मध्ये स्टे दिलेला आहे. याचा अर्थ सांगण्यात यावा. तसेच स्टे कॉपीची प्रत संबधीतांना आणि प्रशासनातील संबधीत अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत का? म्हाडाच्या नियामानुसार कारवाई झाली आहे का?

श्री.गजानन मनगटे :नारेगांव येथील 12 एकर जागेवर अनाधिकृत प्लॉटींग/बांधकाम झालेले आहे. त्यावर कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती :महानगरपालिके अंतर्गत जे बीओटी प्रकल्प चालु आहे. त्यामध्ये राकाज प्रकरण भविष्यात होऊ नये याची काळजी घेण्यात यावी. हर्सुल आणि मिटमिटा संदर्भात स.सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले त्याबाबत खुलासा सादर करावा.

उपअभियंता (न.र.) :हर्सुल येथील रेखांकनाला सन 2011 ला लेआऊट मंजूर करण्यात आला होता. काही भुखंडाना परवानगी देण्यात आली होती. माझ्याकडे सदरील भाग हा मे महिण्यात आला. त्यापुर्वीची माहिती मी सांगु शकत नाही. हर्सुल कारागृहाचे पत्र आल्यावर सदरील बाब निर्दशनास आली.

श्री.नाईकवाडी र.अब्दुल :शासन जी.आर. नव्हता का?

उपअभियंता (न.र.) :हर्सुल कारागृहाने कळविले की, गृह विभागाचा जी.आर.नुसार जेलच्या कंम्पाऊड पासून 182 मीटरपर्यंत कोणतेही बांधकाम करू नये. असा होता. डिसेंबर 2013 रोजी अर्बन डेंव्हलम्पमेंट एमआरटीपी 154 खाली जेलच्या भिंतीपासून 500 पर्यंत काही बांधकाम करावयाचे असेल तर त्याची उच्च स्तरीय समिती स्थापन केलेली आहे तीची एनओसी असल्याशिवाय बांधकाम परवानगी देण्यात येऊ नये. सदरील शासन निर्णय संचिकेमध्ये मला आढळुन आला नाही. त्यामुळे हा ले आऊट मंजूर झाला.

मा.सभापती :शासन निर्णय केव्हा निघाला.

उपअभियंता(न.र.)श्री.देशमुखः डिसेंबर 2013 रोजी अर्बन डेंव्हलम्पमेंटचा शासन निर्णय आहे. गृह खात्याचा पुर्वीचा शासन निर्णय आहे.

श्री.नाईकवाडी र.अब्दुल :शासन जी.आर.कडे अधिकारी लक्ष देत नाही. त्यामुळे अशा घटना घडतात. असे अधिकारी असतील तर महानगरपालिका चालणार नाही.

श्री.नितीन चित्ते :शासनाचे 4 डिसेंबर 2013 रोजीचा जी.आर. आहे. सर्व महानगरपालिका आयुक्तांना देण्यात आलेला आहे.

मा.सभापती :182 मीटरचा शासन निर्णय केव्हा निघालेला आहे आणि तो महापालिकेकडे उपलब्ध नव्हता का?

उपअभियंता(न.र.)श्री.देशमुख : उपलब्ध नव्हता.

श्री.नितीन चित्ते :(स.सदस्य Chapter 5 सभागृहात वाचून दाखवतात.) 4 जानेवारी 1964 चे नोटीफिकेशन आहे.

उपअभियंता(न.र.)श्री.देशमुखःहर्सुल कारागृहाने जेव्हा हया जी.आर.बाबत माहिती दिली त्यावेळी तो सर्च करून दोन भुखंड क्रमांक 108, 111बाबत तीव्र आक्षेप होता. त्यावेळी कळविण्यात आले की, बांधकाम परवानगी दिली गेली आह त्याच्या आधारे बांधकाम करू नका म्हणजे जास्त नुकसान होणार नाही. परंतु हर्सुल प्रशासनाने पत्र दिले की असे कळविलेले असतांना सुध्दा त्या ठिकाणी बांधकाम चालु आहे. त्यामुळे त्या तीन्ही परवानग्या रद्द केलेल्या आहेत.

श्री.नाईकवाडी र.अब्दुल :पत्र केव्हा दिले आहे.

उपअभियंता(न.र.)श्री.देशमुखःसदरील मॅटर कोर्टात चालू आहे. त्यामुळे सर्व अभिलेख वकीलांकडे दिलेले आहेत.

श्री.नाईकवाडी र.अब्दुल :2014 ला बांधकाम परवानगी दिली जाते व दिड वर्षानंतर परवानगी रद्द केल्याची नोटीस दिली जाते. तो पर्यंत इमारतीचे पुर्ण बांधकाम होते. तीन दिवसांची नोटीस देण्यात आली. ज्यांनी नोटीस दिली त्यांना अधिकार नाही.

श्री.एडके प्रकाश :सामान्य नागरीकांना माहिती असते की, विमानतळाच्या जवळ परवानगी देता येत नाही बांधकाम करता येत नाही. प्रकरणात 1964 ची नोटीफिकेशन आहे. अधिकारी फक्त देवाण घेवाण करून परवानग्या दिली जाते का?

श्री.नाईकवाडी र.अब्दुल :संबधीता विरूध्द कार्यवाही केली पाहिजे.

मा.सभापती : या संदर्भात न.र. विभागाने परवानगी दिलेली असतांनाही जी.आर लक्षात न आल्यामुळे परवानगी दिलेली आहे. या संदर्भात प्रशासनाची पुढील भुमिका काय घ्यावी याबद्दल माहिती द्यावी.

श्री.एडके प्रकाश :संबधीतांविरूध्द कारवाई करण्यात यावी.

उपअभियंता(न.र.)श्री.देशमुखःसंबधीत नागरीक याच मुद्दांवर मा.न्यायालयात गेलेले आहे. त्यामुळे या ठिकाणी निर्णय घेण्यात अडचण येईल. विधी सल्लागार यांना विचारून घ्यावे.

श्री.नितीन चित्ते :दिनांक 29.9.2011 रोजी ले आऊटला मंजूरी दिली होती. मा.आयुक्तांची मंजूरी आहे 29.09.2009, प्रशासनाने खुलासा करावा, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) औरंगाबाद यांचे आदेश जा.क्र. 2001 नुसार पृष्ट क्रमांक 6 दिनांक 4.3.2009 नुसार 2 ब नुसार अर्जदार यांनी जमीनीच्या बाजार रोखीच्या 50 टक्के रक्कम क्र.420 दिनांक 08.01.2010 अन्वये शासन जमा केल्यामुळे हस्तांतरण न होणारी ही अट शिथील करण्यात येत आहे.

उपअभियंता(न.र.)श्री.देशमुखःहस्तांतरीत न होणारी आणि प्रीमियम भरणारी प्रकरण महसूल विभागाशी संबधीत आहे. महापालिकेने फक्त नियोजन प्राधिकरण म्हणुन काम केले आहे.

श्री.नितीन चित्ते :एकुण एरीया 34 हजार 500 स्के.मी. ले आऊट दिला 23,118.65 स्के.मी. आहे.

उपअभियंता(न.र.)श्री.देशमुखःयासंबधीची संचिका वकीलांकडे आहे. सर्व माहिती देण्यात येईल. आजच चार्ज घेतलेला आहे.

श्री.गजानन बारवाल :ही गंभीर बाब आहे. ही आपली चुक झालेली आहे. नुकसान भरपाई त्यांना द्यावी लागेल.

उपअभियंता(न.र.) श्री.देशमुख : स्टे मिळालेला आहे.

मा.सभापती :स.सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर येणाऱ्या बैठकीत सविस्तर खुलासा करावा.

श्री.रावसाहेब आमले :गट नंबर 155 बाबत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :सदरील गट नंबर वर मा.न्यायालयाने स्टे दिलेला आहे.

श्री.नितीन चित्ते :गट नंबर 155 बाबत जे दोषी आहेत त्यांचेवर कारवाई झाली पाहिजे. चौकशी झाली पाहिजे चौकशी करीता तांत्रिक अधिकारी जसे शहर अभियंता लेव्हलच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. या बाबतीत मला कुठलीही माहिती देण्यात आलेली नाही.

श्री.नाईकवाडी र.अब्दुल :संबधीत प्रकरणाशी जे अधिकारी असेल त्यांना चौकशी होईपर्यंत निलंबित करण्यात यावे.

मा.अतिरिक्त आयुक्त :गट नंबर 155 बाबत जो विषय चालू आहे. त्यामध्ये श्री.देशमुख यांनी आजच चार्ज घेतलेला आहे तसेच संबधीत प्रकरणाची संचिका मा.न्यायालयात आहे. महानगरपालिकेने सदरील ठिकाणी परवानगी दिली त्यानंतर पुन्हा नाकारली याबाबतीतील सर्व कायदेशिरबाबी तपासुन माहिती विभाग प्रमुख देतील. मा.न्यायालयात प्रकरण असेल तर त्यावर कायद्यानुसार भाष्य करता येत नाही. पुढील बैठकीपर्यंत लेखी माहिती संबधीत स.सदस्य यांना देण्यात यावी.

उपअभियंता(न.र.)श्री.देशमुखः संबधीत स.सदस्यांना माहिती तात्काळ देण्यात येईल.

श्री.जगताप कमलाकर :औषध फवारणी करण्यात येत नाही. कुठल्याही ठेकेदारामार्फत माझ्या वार्डात आजपर्यंत फवारणी करण्यात आलेली नाही.

श्री.गजानन बारवाल :संबधीतांकडे फवारणी यंत्र आहे का? माहिती देण्यात यावी.

श्री.मोहन मेघावाले :वार्डामध्ये फॉगींग, धुर फवारणी नियमित करण्यात येत नाही. मागील बैठकीत ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट करण्याबाबत आदेशित केलेहोते परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही. आरोग्य विभागास फॉंगीग,धुर फवारणी बाबत मशीनबाबत विचारणा केली आहे. संबधीत ठेकेदाराचे बील नियमित अदा केले जाते.

श्रीमती ज्योती पिंजरकर :नियमित फवारणी केली जावी. वार्डामध्ये डासांचा प्रादुर्भाव वाढलेला आहे. साथचे रोग पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरीकांच्या समस्या सुटल्या जाव्या.

मलेरिया विभाग प्र.श्री.उणवणे :श्री.दुबे, पेठे, नागरे, व इतर ठेकेदार आहेत याबाबीत यापुढे अशी तक्रार येणार नाही याची काळजी घेतली जाईल.

श्री.नितीन चित्ते :सिडकोच्या एकाही गार्डनमध्ये फवारणी केली नाही, वार्डामध्ये फवारणी करण्यात येत नाही.

श्री.मोहन मेघावाले :आठ दिवस झालेले आहे चार्ज घेऊन या आठ दिवसात संबधीत अधिकारी यांनी माहिती घ्यायला हवी. सर्व ठेकेदारांची चौकशी करून त्यांना ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. बील थांबविण्यात यावे.

मा.सभापती :स.सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दांबाबत संबधीत कंत्राटदारांची चौकशी करून त्यांचेवर कोणती कारवाई केली जाईल याबाबत पुढील सभेत माहिती देण्यात यावी.

श्री.आमले :मुकूंदवाडी येथील शाळेतील विद्युतबील भरणा न केल्यामुळे विद्युतपुरवठा खंडीत केलेले आहे.

उपअभियंता(वि.)श्री.देशमुखःमहानगरपालिकेचे विद्युत देयकबाबतची संचिका लेखा विभागात गेल्या 3 महिण्यांपासून प्रलंबीत आहे. मुकूंदवाडी येथील खंडीत झालेला विद्युत पुरवठा तात्काळ पुर्वरत केला जाईल.

श्रीमती शेख समीना :विद्युत विभागाबाबत माहितीची मागणी केली होती.. कार्यकारी अभियंता यांना याबाबत माहिती देण्यात आली होती. सन 2014-15 मध्ये किती कामे करण्यात आली. याबाबत चौकशी समिती नेमण्यात आली आहे.याबाबतचे उत्तर प्राप्त झालेले नाही.

| | |
|---|---|
| मा.सभापती | :याबाबत खुलासा करण्यात यावा. |
| विद्युत विभाग प्रमुख | :चौकशी समितीबाबत माझ्याकडे माहिती नाही. |
| आस्थापना अधिकारी-1 | :या विषयाबाबत माहिती घेऊन माहिती सादर करण्यात येईल. |
| मा.अतिरिक्त आयुक्त | :विद्युत विभाग प्रमुख यांनी याबाबतची माहिती आस्थापना विभागात देण्यात यावी. आस्थापना विभागाने पुढील कार्यवाही करावी. अनियमितता झाली असली तर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |
| श्री.गजानन बारवाल | :स.सदस्य श्री.कैलास गायकवाड स्वतः उपोषणाला बसले होते. चौकशी झाली आहे. माहिती देण्यात यावी. |
| मा.अतिरिक्त आयुक्त | :याबाबतची माहिती घेण्यात येईल. |
| श्रीमती शेख समीना | :संबधीत अधिकारी यांचे सेवानिवृत्तीचे सर्व फायदे थांबविण्यात यावे. चौकशी झाली आहे अहवाल सादर झालेला नाही. |
| मा.सभापती | :याबाबतची माहिती स.सदस्यांना आठ दिवसात देण्यात यावी. |
| श्री.नाईकवाडी र.अब्दुल | :याबाबतची माहिती स्थायी समितीच्या सर्व स.सदस्यांना देण्यात यावी. |
| श्री.आमले | :मिटामिटा वार्डातील गट नंबर 29 मधील महापालिका आरक्षीत जागा शाळा आणि खेळाचे मैदान, शॉपींग सेंटरसाठी आहे. काही भुखंड माफीया 600 स्के.फुटचे प्लॉट पाडून विक्री करत आहे. मिटमिटा येथे 600 विद्यार्थी मनपाच्या शाळेत आहे. त्याठिकाणी विद्यार्थ्यांना वर्ग खोल्या, जागा बसण्यास नाही. आणि भुखंड माफीया सर्रास प्लॉटची विक्री करत आहे, बांधकाम करीत आहे. प्रशासनाने तात्काळ सदरील बांधकाम, तसेच विक्रीवर कारवाई करण्यात यावी. |
| श्री.गजानन बारवाल | :मनपाच्या जागांवर प्रशासनाने महानगरपालिकेचा आरक्षणाबाबत माहितीचा बोर्ड लावण्यात यावा. |
| मा.सभापती | :प्रशासनाने तात्काळ सदरील अतिक्रमणावर कारवाई करण्यात यावी. खुलासा करण्यात यावा. |
| श्री.गजानन मनगटे | :नारेगांव येथील अनाधिकृत प्लॉटींगवर कारवाई करण्यात यावी. |
| प्रशासकीय अधिकारी | :मिटमिटा येथील आरक्षणाबाबत तात्काळ कारवाई करण्यात येईल. सर्व माहिती घेऊन दोन दिवसात कारवाई करण्यात येईल. |
| मा.सभापती | :मिटमिटा, नारेगांव तसेच शहरातील 20 बाय 30चे अनाधिकृत प्लॉटींग चालु असेल त्यावर प्रशासनाने अतिक्रमण काढण्याची तात्काळ कारवाई करावी. |
| श्री.नितीन चित्ते | :मौजे सातारा गट नंबर 91, 107 मोजे शहानुरवाडी सर्वे नंबर 20,21 मधील जाणाऱ्या 15 मीटरच्या रस्त्याच्या बाजुला लागुन नाल्यावर पुर्ण अतिक्रमण झालेले आहे. दिनांक 19.03.2014 रोजी मा.आयुक्तांना संबधीत नागरीकांनी पत्र दिलेले आहे. अतिक्रमण न काढल्यास 10000 लोकवस्तीला त्याचा धोका आहे. (महाराष्ट्र प्रदुषण बोर्ड यांनी मनपास दिलेले पत्र सभागृहात स.सदस्य वाचून दाखवतात) मा.न्यायालयाचे आदेश आहे की, तेथील अतिक्रमण काढण्यात यावे. खुलासा करण्यात यावा. |
| प्रशासकीय अधिकारी | :पुर्वी त्या नाल्याची पाहणी केलेली आहे. परंतु हद्दीचा मुद्दा पुर्वी उपस्थित झाला होता. आता सातारा देवळाई भाग मनपामध्ये आला असल्यामुळे नगर रचना विभागाकडुन मार्कीग करून तपासणी करून पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| श्री.नितीन चित्ते | :टाईल्सची कंपणी ही मनपा हद्दीमध्ये आहे. अतिक्रमण काढण्यात यावे. |
| मा.सभापती | :अतिक्रमण काढण्याची कारवाई तात्काळ करण्यात यावी. |

श्री.नाईकवाडी अब्दुल :कटकट येथील नाल्यावर लेआऊटचा प्लॉट आहे त्यास परवानगी आहे. अशी परवानगी देण्यात येते का?

उपअभियंता न.र.श्री.देशमुख:नाल्याचे डिमार्टेशन करण्यासाठी सिटी सर्वे ऑफिसला पत्र दिलेले आहे. माहिती आल्यावर नाल्यावरील अतिक्रमण काढण्यात येईल.

मा.सभापती :संबधीत कार्यालयाशी पाठपुरावा करण्यात यावा.

मा.अतिरिक्त आयुक्त :सिटी सर्वे कार्यालयाशी यासंबधी पाठपुरावा करण्यात येईल.

श्री.खान इरशाद इब्राहिम:आझाद चौक ते रोशनगेट येथील 2011 पासून रस्ता प्रलंबित आहे. काही मालमत्तांअभावी रस्त्याचे काम प्रलंबित आहे.

श्री.अब्दुल र.नाईकवाडी :सुरवातीस मोबदला अदा करण्यात यावा त्यानंतर कारवाई करण्यात यावी.

उपअभियंता न.र.श्री.देशमुख:रस्ता रूंदिकरणात ज्या नागरीकांचे मालमत्ता ताब्यात घेतली त्यांचे प्रस्ताव आले होते त्यांना मोबदला दिला आहे. मोबदला देण्याबाबत जे राहलेले आहे. त्याबाबत माहिती घेऊन पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.

श्री.विकास एडके :30 तारखेला विद्युत दुरूस्तीची मुदत संपलेली आहे. माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :खुलासा करावा.

विद्युत विभाग प्रमुख :विद्युत दुरूस्तीचे कंत्राट संपलेले आहे. नव्याने निविदा काढण्याची कार्यवाही सुरू केलेली आहे.

श्री.विकास एडके :श्री.देशमुख यांना अनेक तक्रारी दिलेल्या आहेत.

श्री.देशमुख, विद्युत विभाग:स.सदस्यांच्या तक्रारी आलेल्या आहेत. दोन दिवसांत तक्रारी निकाली काढण्यात येईल. सर्व कंत्राटदारांना मुदतवाढ देण्यात आली आहे.

श्री.मोहन मेघावाले :माझ्या वार्डातील लाईट नेहमी बंद असतात.

मा.सभापती :संबधीत कंत्राटदारांनी वार्डातील विद्युतच्या समस्या तात्काळ सोडविण्यात याव्या. स.सदस्य यांना विश्वासात घेऊन त्यांच्या वार्डातील विद्युत दिव्यांचा प्रश्न सोडविण्यात यावा. तोपर्यंत संबधीतांचे देयक अदा करण्यात येऊ नये.

श्री.देशमुख, विद्युत विभाग:30 जुन रोजी मुदत संपलेली आहे.

विद्युत विभाग प्रमुख :पुढील निवीदेची कार्यवाही जो पर्यंत होत नाही तो पर्यंत मुदतवाढ कायम राहील.

श्रीमती ज्योती पिंजरकर :आंबेडकर चौक ते बळीरामपाटील तसेच वार्डातील मेनरोडवरील लाईट 15 दिवसांपासून बंद अवस्थेत आहे ते तात्काळ सुरू करण्यात यावे.

श्री.नितीन चित्ते :विद्युत विभाग प्रमुख श्री.बनसोडे सेवानिवृत्त झाल्यापासून विद्युत विभागाच्या अडचणी वाढलेल्या आहे. 20 तारखेच्या सभेमध्ये विषय घेतला होता दोन अधिकारी यांना मुदतवाढ देणे संदर्भांत सूचना केलेल्या होत्या. श्री.बनसोडे, श्री.एम.ए.पठाण, नगर सचिव यांना मानधनावर नियुक्ती करण्यात यावी.

श्री.मोहन मेघावाले :मागील मा.सर्वसाधारण सभेमध्ये मा.महापौर यांनी रूलिंग देण्यात आलेली आहे श्री.एम.ए.पठाण यांना मानधनावर घेण्यात यावे त्याच प्रमाणे विद्युत विभागाचे श्री.बनसोडे यांनाही मानधनावर घेण्यात यावे.

श्री.विकास एडके :मुदतवाढ दिलेल्या कंत्राटदारांची माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : श्री.बनसोडे, श्री.एम.ए.पठाण, नगर सचिव यांना मानधनावर घेण्याबाबत मा.सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला आहे. त्या प्रमाणे त्वरीत कार्यवाही करावी.

श्री.रावसाहेब आमले :गुंठेवारी विभागास वार्ड क्र 14 मध्ये रेस्टॉरंट बार च्या गुंठेवारीचे नियमितकरण कसे झाले याबाबत विचारणा करण्यात आली होती. विभागाकडुन पत्र प्राप्त झाले की,श्रीमती मनिषा तुपे रा.माजी सैनिक कॉलनी,पडेगांव येथील गुंठेवारी नियमितीकरण

नियमानुसार दाखल आहे. मंजूर नकाशाच्या प्रत सोबत देण्यात येत आहे. परंतु सदरील माहिती ही खोटी आहे.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

गुंठेवारी विभाग (श्री.फड):संचिकेची छायांकित प्रत देण्यात आलेली आहे. कायदेशीर बाबी तपासून सर्व कार्यवाही करण्यात आलेली आहे.

श्रीमती कमल नरोटे :मागील सभेमध्ये प्रश्न विचारणा करण्यात आली होती की सन 2015 मध्ये किती घरांची गुंठेवारीमध्ये नियमितकरण करण्यात आले याबाबतची माहिती अद्यापपर्यंत मिळालेली नाही.

मा.सभापती :माहिती देण्यात यावी.

श्री.फड, वार्ड अभियंता:पुढील सभेमध्ये माहिती देण्यात येईल.

मा.सभापती :लेखी माहिती अद्यापपर्यंत दिलेली नाही हे योग्य नाही. तात्काळ माहिती उपलब्ध करून देण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल :पान क्रमांक 13 बाबत नाला सफाई माहिती देण्यात यावी.

वार्ड अभियंता श्री.पवार :जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याची माहिती स.सदस्यांना लवकरात लवकर देण्यात येईल.

श्रीमती ज्योती पिंजरकर :आजच्या सभेमध्ये एकाही अधिकारी यांनी खुलासा केलेला नाही.

मा.सभापती :पुढच्या सभेत लेखी माहिती देण्यात यावी.

श्री.मोहन मेघावाले :आझाद कॉलेज नाल्याचे काम अपुर्ण झालेले आहे. नियमित सफाई करण्यात येत नाही. नाला उघडयावर असल्यामुळे त्या ठिकाणी उग्र वासामुळे आजुबाजूचे नागरीक हैराण आहे. तसेच वार्डातील मेनरोडचे रस्त्याच्या कामामधील ड्रेनेज लाईनच्या कामामुळे काम थांबलेले आहे. सलीम अली सरोवर ते भारतमाता पर्यंत अपुरे काम पुर्ण करावे. ते पुर्ण करण्यात यावे.

श्री.कुलकर्णी सुभाष :स्वामी विवेकानंद गार्डन येथील मुरूम काढण्यात येत आहे. तो कुठे टाकला जातो याची माहिती देण्यात यावी. सदरची माहिती अद्यापर्यंत अप्राप्त आहे.

श्री.मोहन मेघावाले :याबाबतची माहिती दिलेली नाही. विस्तृत माहिती देण्यात यावी. 15 दिवस झाले माहिती दिली नाही.

श्री.अब्दुल नाईकवाडी :हर्सुल येथील गाळ निविदा काढली होती पुढच्या होती. पुढच्या बैठकीत काम झाले.

कार्य अभियंता (श्री.कोल्हे):सदर संचिका मा.आयुक्त महोदय यांचेकडे पाठविण्यात आलेली आहे.

मा.सभापती :स्थायी समिती सभेमध्ये स.सदस्यांची विचारणा केलेली माहिती सभेपुर्वी स.सदस्यांपर्यंत पोहचली पाहिजे किंवा लेखी स्वरूपात दिली पाहिजे याची प्रशासनाने दक्षता घ्यावी.

**विषय क्र. 03 :**

दिनांक 22/06/2015 (का.प.क्र.02) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.सभापती :विषय क्रमांक 3 इतिवृत्त कायम करण्यात येते, दुरूस्ती सह मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

दिनांक 22/06/2015 (का.प.क्र.02) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. 04 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, यापुर्वी मा.स्थायी समिती सभेचा ठराव क्र.89 दि. 22/01/2015 रोजी झालेल्या मा.स्थायी समिती सभेत आस्थापना विभागास दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेच्या दैनिक वेतनावरील वर्ग-4 कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेशक्र.मनपा/आस्था-2/153/2015, दिनांक 28/01/2015

रोजीच्या आदेशान्वये दिनांक 30/04/2015 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत मनपा आस्थापना वरील वर्ग-4 संवर्गातील खालील कर्मचारी कार्यरत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव (सर्वश्री/श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/ दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती.मंदाबाई तुकाराम दांडगे | दै.वे. सेविका | महिला व बालकल्याण कक्ष | रु.340/- |
| 2 | दिपक शेषराव दाभाडे | दै.वे. सेवक | मा.उपआयुक्त (म) दालन | रु.340/- |
| 3 | रविंद्र प्रभाकर देवकर | दै.वे. वॉचमन | मालमत्ता विभाग | रु.340/- |
| 4 | स.शहाबुद्यीन स.जकरूद्यीन | दै.वे. वॉचमन | मालमत्ता विभाग | रु.340/- |
| 5 | रमेश सखाराम जाधव | दै.वे. वॉचमन | मालमत्ता विभाग | रु.340/- |
| 6 | रविंद्र विठ्ठल कांबळे | दै.वे. सेवक | वाचनालय | रु.340/- |
| 7 | रमेश दत्तु देवडे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 8 | विनोद पांडूरंग तुपे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 9 | सुधाकर आसाराम त्रिंभुवन | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 10 | गोविंद कृष्णराव साळवे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 11 | संजय विठ्ठल इंगळे | दै.वे. सेवक | कर आकरणी विभाग | रु.340/- |
| 12 | समिंदर रमेश | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 13 | प्रल्हाद गुंजाळे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 14 | कडूबा औताडे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 15 | मिलिंद दत्तोपंत आम्ले | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 16 | सिध्दार्थ पांडूरंग दांडगे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 17 | सतिश सोमाजी गडवे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 18 | सर्जेराव शिंदे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 19 | सुभाष निलकंठ | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 20 | रामेश्वर फुलारे | दै.वे. सेवक | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 21 | कमलबाई शिवन्ना गुडम | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 22 | कमलबाई भिमराव साळवे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 23 | रंजना तुळशीराम मोरे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 24 | लताबाई कारभारी घाटे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 25 | शहनाज बेगम रशिद खॉं | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 26 | इंदुबाई पांडूरंग दांडगे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 27 | इंदुबाई राजुरे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 28 | मंगलाबाई मिश्राम | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 29 | चंद्रकला शंकर आम्ले | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 30 | उषा सुनिल घोगरे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 31 | संध्या श्याम साळवे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 32 | सुनिता किसन साळवे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 33 | मलेका शाहीन शे.जलील अहेमद | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 34 | यशोधरा नामदेव वसाटे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 35 | विद्या मनोहर शेळवणे | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 36 | छायाबाई अशोक म्हस्के | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 37 | शारदाबाई दलबहादुरसिंग ठाकुर | दै.वे. सेविका | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 38 | राजेश प्रभाकर पवार | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 39 | चंद्रमणी समाधान गवई | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 40 | रावसाहेब जाधव | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 41 | कुदन काशिनाथ गणोरे | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 42 | मनोज लखनलाल तुळशीबागवाले | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 43 | रविंद्र खापे | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 44 | संदिप सुभाष घाग | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 45 | प्रल्हाद विठ्ठल करडे | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 46 | साहेबराव मुक्ताजी गायकवाड | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 47 | विजय पंडीतराव गायकवाड | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 48 | अय्युब खाँ सांडू खाँ | दै.वे. चौकीदार | शिक्षण विभाग | रु.340/- |
| 49 | रमेश चंद्रय्या परके | दै.वे. वि. लाईनमन | विद्युत विभाग | रु. 430/- |
| 50 | अण्णासाहेब दाणे | दै.वे. वि. लाईनमन | उपअभियंता पा.पु | रु. 430/- |
| 51 | कैलास श्रीपत बनकर | दै.वे. वि. लाईनमन | विद्युत विभाग | रु. 430/- |
| 52 | असलम खान मुकीद खान | दै.वे. मजुर | निवडणूक विभाग | रु.340/- |
| 53 | इलियास अ.बसरावी | दै.वे. मदतनीस | यांत्रिकी विभाग | रु.340/- |
| 54 | मो.युसुफ़ मो.उस्मान | दै.वे. मदतनीस | यांत्रिकी विभाग | रु.340/- |
| 55 | शेख इम्रान शेख फ़जलोद्दीन | कक्ष सेवक | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 56 | म.गयासोद्दीन सलामोद्दीन | कक्ष सेवक | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 57 | विमलबाई भुईगड | सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 58 | राजेंद्र दिनकर कुंभारीकर | प्रयोग शाळा सहाय्यक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 59 | सौ.जयश्री वसंत जोशी | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 60 | विलास दत्तू नाईक | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 61 | सुरेश दामोधर नलावडे | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 62 | श्रीमती.जिजाबाई नवगिरे | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 63 | श्रीमती.पार्वता दाडेकर | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 64 | भरत पचलोरे | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 65 | सुभाष दत्तात्रय सुरासे | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 66 | मुंढे भानुदास नरसू | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 67 | कमल कचरु मोरे | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 68 | भोसले पंढरीनाथ देवीदास | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 69 | नारायण शेषराव जंगले | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 70 | वाचा सुंदर संतोष | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 71 | निकम शांताराम नारायण | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 72 | तनवीर खान नियाजी | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 340/- |
| 73 | शेख हबीब लाल | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 74 | मनिषा किसनराव पाटील | दै.वे. नोंदनी लिपिक | आरोग्य विभाग | रु. 430/- |
| 75 | फ़िरोज खान गणी खान | दै.वे. वॉर्डबॉय | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 76 | मोहमंद सज्जाद सईद अन्सारी | दै.वे. वॉर्डबॉय | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 77 | परवेश अण्णाजी मिसाळ | दै.वे. वॉचमन | आरोग्य विभाग | रु.340/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 78 | युवराज लांडगे | दै.वे. सेवक | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 79 | जाधव सखुबाई शंकर | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 80 | गायकवाड मिना गणपत | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 81 | वाघ सखुबाई आसाराम | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 82 | काळे मिनाबाई काशिनाथ | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 83 | फुले धुरपताबाई सांडू | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 84 | फ़िरंगी लिला नरसिंग | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 85 | कांबळे शोभा साहेबराव | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 86 | के.डब्ल्यु.पोपलवार | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु.340/- |
| 87 | विजय गोविंद साबळे | प्रयोग शाळा सहाय्यक | आरोग्य विभाग | रु.430/- |
| 88 | दिलीप श्रीधर ठोंबरे | दै.वे.मजुर | अग्निशमन विभाग | रु.340/- |
| 89 | बाबासाहेब रंजाजी कांबळे | दै.वे. हमाल | वॉर्ड-ब कार्यालय | रु.340/- |
| 90 | राजेश दिपचंद लाहोट | दै.वे. स्विपर | वॉर्ड-क कार्यालय | रु.340/- |
| 91 | किशोर विनायक साबळे | दै.वे. मजुर | वॉर्ड-क कार्यालय | रु.340/- |
| 92 | नदिम अख्तर | दै.वे. मजुर | वॉर्ड-क कार्यालय | रु.340/- |
| 93 | विष्णू नारायण काळे | दै.वे. मजुर | वॉर्ड-क कार्यालय | रु.340/- |
| 94 | मिर्झा अन्वर बेग | दै.वे. मजुर | वॉर्ड-क कार्यालय | रु.340/- |
| 95 | फेरोज अहमद मुस्ताफ अ खान | दै.वे.वॉचमन | वार्ड क कार्यालय | रू.340/- |
| 96 | गणेश साहेबराव उजगरे | दै.वे. मजुर | वॉर्ड-ड कार्यालय | रु.340/- |
| 97 | अनिल येडूबा साळवे | दै.वे. मजुर | वॉर्ड-ड कार्यालय | रु.340/- |
| 98 | लताबाई अशोक साळवे | दै.वे. मजुर | वॉर्ड-ड कार्यालय | रु.340/- |
| 99 | संजय शामराव ठोबरे | दै.वे. मजुर | वॉर्ड-ड कार्यालय | रु.340/- |
| 100 | मोहमंद मुदस्सीर शेख बशीर | दै.वे. मजुर | वॉर्ड-ई कार्यालय | रु.340/- |
| 101 | शेख जावेद शे.जाफर | दै.वे. मजुर | वॉर्ड-ई कार्यालय | रु.340/- |
| 102 | श्रीमती.रमादेवी भगवान म्हस्के | दै.वे. सेविका | वॉर्ड-ई कार्यालय | रु.340/- |
| 103 | राजु चंद्रभान बढे | दै.वे. मजुर | वॉर्ड-ई कार्यालय | रु.340/- |
| 104 | द्वारकाबाई नाना अडागळे | दै.वे. मजुर | वॉर्ड-डकार्यालय | रु.340/- |
| 105 | चतुराबाई भिमराव हतागळे | दै.वे. मजुर | वॉर्ड-ई कार्यालय | रु.340/- |
| 106 | रविंद्र शामसुंदर कांबळे | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 107 | संजय रतन खरे | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 108 | किशोर खुशाल रामटेके | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 109 | अतुल हरीचंद्र फुलके | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 110 | शोभाबाई दिलीप साळवे | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 111 | जाईबाई साहेबराव साळवे | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 112 | हौसाबाई रामभाऊ वडमोर | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 113 | मिनाबाई दामोधर सोनवणे | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 114 | पुष्पाबाई जानकु त्रिभुवन | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 115 | सावित्रीबाई भगवान मगरे | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 116 | कांताबाई अंबादास पटेकर | दै.वे. मजुर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु.340/- |
| 117 | विजय लक्ष्मणराव देशपांडे | दै.वे.वॉचमन | भारत माता मंदिर (सांस्कृतीक विभाग) | रु.340/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 118 | सुनिल किसनराव दाभाडे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 119 | सतिश केशव बनकर | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 120 | राजेंद्र भागाजी नवगिरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 121 | मिलींद धनाजी गायकवाड | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 122 | बालसिंग भोपाल कणसे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 123 | रामदास हरिचंद्र बमणे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 124 | किशोर मोतीराम उगळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 125 | राजेश नाथाजी गवळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 126 | रावसाहेब हरीभाऊ मगरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 127 | बाळकृष्ण कचरु भारसाखळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 128 | सुरेश नामदेव खरात | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 129 | कैलास पांडुरंग वाणी | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 130 | संतोष गोविंद जगे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 131 | वैजिनाथ देवराव साबळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 132 | सुनिल दौलत अंभोरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 133 | बाबासाहेब भाऊराव भारसाखळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 134 | छगन तुळजाराम सलामपूरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 135 | सुभाष बाबुलाल हरणे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 136 | बबन पंडीतराव जाधव | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 137 | राधाकिसन फकीरचंद बकले | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु.340/- |
| 138 | वाजीद खान मन्सूर खान | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.340/- |
| 139 | इम्रान उल्ल खान फ़ैज उल्ला | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.340/- |
| 140 | फ़ारुख अली तुराब अली | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.340/- |
| 141 | एहतेशाम अली हाश्मी | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.340/- |
| 142 | मिर्झा रुफ़द बेग | दै.वे.सेवक | वाचनालय | रु.340/- |
| 143 | सुरेश धाबर्डे | दै.वे. चोकीदार | नगर सचिव विभाग (मा.सभापती, स्था.स.) | रु.340/- |

करिता उपरोक्त प्रमाणे एकुण 143 दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि. 03/05/2015 ते दिनांक 31/10/2015 पर्यंत 06 (सहा) महिन्याची मुदतवाढ देण्यात येऊन कामावर रुजू करुन घेण्याची मंजुरी देण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद**

श्री.गजानन बारवाल :सौ.निरू गवल यांचा मुदतवाढीच्या प्रस्तावामध्ये नांव नसल्याने त्यांनी अर्ज केलेला आहे.

मा.सभापती :प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.गजानन मनगटे :कोणकोणते कर्मचारी अधिकाऱ्यांच्या घरी कार्यरत आहे,याचाही खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (म) :श्रीमती गवल हे आरोग्य विभागामध्ये कार्यरत होते, 7 महिण्याची रक्कम वेळेवर न भरल्यामुळे विभाग प्रमुखांनी कामावरून कमी केलेले आहे. म्हणुन त्यांचे नांव या प्रस्तावामध्ये आलेले नाही.

श्री.गजानन बारवाल :कुठे काम करतात. खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (म) :याबाबतची माहिती कार्यालयीन रेकॉर्डमध्ये नाही. त्यामुळे सांगु शकत नाही.

श्री.गजानन बारवाल : 8 महिण्यांपासून आरोग्य अधिकारी श्रीमती जयश्री कुलकर्णी यांचे घरी शिक्षा म्हणुन 8 महिणे कार्यरत होते. अशी शिक्षा देण्याचा त्यांना अधिकार आहे का? कर्मचारी यांनी कुठलाही घोळ केलेला नाही. असे असतांना 8 महिण्यांची शिक्षा अमानुषपणे देण्यात आली.

श्री.नितीन चित्ते :वर्ग चार कर्मचारी यांना आर्थीक व्यवहाराचे काम देता येते का?

उपआयुक्त (म) :आर्थीक व्यवहाराचे काम देता येत नाही.

श्री.गजानन बारवाल :संबधीत कर्मचारी यांना मुदतवाढ देण्यात यावी. या लिस्टमध्ये त्यांचे नांवाचा समावेश करण्यात यावा.

मा.सभापती : स.सदस्य यांचे भावना लक्षात घेता विषय क्र.04 मध्ये सौ.निरू कृष्णा गवल दैनिक वेतन कर्मचारी आरोग्य विभाग यांचे नांव मुदतवाढीच्या प्रस्तावामध्ये नसल्यामुळे, त्यांनी स्थायी समितीकडे विनंती अर्ज दिलेला आहे. त्यांच्याकडून चुका झाल्याचे माहितीवरून दिसून येते. तथापी त्यांची मनपा आस्थापनेवर 15-16 वर्षाची सेवा लक्षात घेता, र.रू.500/- चा दंड आकारण्यात येऊन त्यांचेकडून र.रू.100/- च्या स्टँपवर त्यांचेकडून यापूढे अशा चूका होणार नाही, असा माफिनामा लिहुन घेण्यांत यावा. या प्रस्तावासोबतच त्यांना मुदतवाढ देण्यांत यावी. विषय क्रमांक 04 मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-4 संवर्गातील अ.क्र.01 ते 143 कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दिनांक 03/05/2015 ते दिनांक 31/10/2015 पर्यंत 06 (सहा) महिन्याची मुदतवाढ देण्यास तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार विषय क्र.04 मध्ये सौ.निरू कृष्णा गवल, दैनिक वेतन कर्मचारी आरोग्य विभाग यांचे नांव मुदतवाढीच्या प्रस्तावामध्ये नसल्यामुळे, त्यांनी स्थायी समितीकडे विनंती अर्ज दिलेला आहे, त्यांच्याकडून चुका झाल्याचे माहितीवरून दिसून येते. तथापी त्यांची मनपा आस्थापनेवर 15-16 वर्षाची सेवा लक्षात घेता, र.रू.500/- चा दंड आकारण्यात येऊन त्यांचेकडून र.रू.100/- च्या स्टँपवर यापूढे अशा चूका होणार नाही, असा माफिनामा लिहुन घेण्यांत यावा. या प्रस्तावासोबतच त्यांना प्रशासनाने मुदतवाढ द्यावी, यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**(महबूबखॉ पठाण)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद